

दैनिक आकर्षण

संपादक : विजय सांगळे



वर्ष ६ ▪ अंक ५१ ▪ शुक्रवार २० नोव्हेंबर २०२६ ▪ पाने ४ मूल्य ₹ २ https://epaper.dainkaakarshan.com E-mail- dainikaakarshan@gmail.com RNI NO. MAHMAR/2021/84322

फिर्यादीच निघाला घरफोड्या!

फॉरेक्स ट्रेडिंगमधील नुकसान लपवण्यासाठी केला चोरीचा बनाव



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

अहिल्यानगर– फॉरेक्स ट्रेडिंगमध्ये झालेले आर्थिक नुकसान घरच्यांपासून लपवण्यासाठी एका तरुणाने चक्क स्वतःच्याच घरात घरफोडी झाल्याचा बनाव रचल्याचा धक्कादायक प्रकार केडगाव येथे उघडकीस आला आहे. कोतवाली पोलिसांनी अत्यंत कौशल्याने तपास करत गुन्हा दाखल झाल्यापासून अवघ्या चार तासांत या प्रकरणाचा छडा लावला असून, फिर्यादी तरुणाला बेड्या ठोकल्या आहेत. आदर्श ज्ञानदेव तनपुरे (वय २५, रा. तानाजी मालुसरे अपार्टमेंट, मराठानगर, केडगाव) असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे.

दिनांक १७ नोव्हेंबर २०२६ रोजी रात्री ११.१५ ते १८ नोव्हेंबर रोजी सकाळी ८ वाजेच्या दरम्यान आदर्श तनपुरे व त्याचे कुटुंबीय घरी नसताना, अज्ञात चोरट्याने फ्लॅटच्या मुख्य दरवाजाचे कुलूप तोडून घरातील १ लाख २५ हजार रुपयांची रोकड चोरून नेल्याची फिर्याद आदर्शने कोतवाली पोलीस ठाण्यात दिली होती. त्यानुसार १८ नोव्हेंबर रोजी दुपारी २.०५ वाजता अज्ञात चोरट्याविरुद्ध घरफोडीचा गुन्हा दाखल करण्यात आला होता.

गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलीस निरीक्षक नितीन देशमुख यांनी तपासाची चक्रे वेगाने फिरवली. गुन्हे शोध पथकाचे प्रमुख सहाय्यक पोलीस निरीक्षक विशाल चिटणीस व त्यांच्या पथकाने घटनास्थळाची पाहणी केली. यावेळी परिसरातील सीसीटीव्ही फुटेज, श्वान पथक, ठसेतज्ज्ञ आणि फॉरेन्सिक युनिटची मदत घेण्यात आली. तपासादरम्यान फिर्यादी आदर्शच्या हालचाली पोलिसांना संशयास्पद वाटल्या. तसेच तो ऑनलाइन फॉरेक्स ट्रेडिंग करत असल्याची गोपनीय माहिती पोलिसांना मिळाली. पोलिसांनी त्याला विश्वासात घेऊन सखोल चौकशी केली असता, त्याने स्वतःच हा बनाव रचल्याची कबुली दिली.

आई माहेरी गेल्यानंतर परस्पर घेतले घरातील पैसे

आदर्शची आई दिवाळी सणानिमित्त माहेरी गेली असताना त्याने परस्पर घरातील १ लाख २५ हजार रुपये टप्प्याटप्प्याने काढून स्वतःच्या एचडीएफसी बँक खात्यात जमा केले. त्यानंतर ही रक्कम त्याने डी-मॅट खात्याद्वारे फॉरेक्स ट्रेडिंगमध्ये गुंतवली. मात्र, यामध्ये त्याचे मोठे आर्थिक नुकसान झाले. हे नुकसान घरच्यांना कळू नये म्हणून त्याने घरफोडीचा बनाव रचला. पोलिसांनी बँकेचे स्टेटमेंट तपासले असता त्यात पैसे जमा केल्याचे स्पष्ट झाले, तसेच पंचासमक्ष जप्त केलेल्या मोबाईलमध्येही डी-मॅट खात्याचे पुरावे आढळून आले आहेत. पोलिसांनी त्याला १८ नोव्हेंबर रोजी अटक केली असून, न्यायालयाने त्याला २१ नोव्हेंबरपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे.

या पथकाने केली कारवाई

ही यशस्वी कारवाई पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन, अपर पोलीस अधीक्षक वैभव कलुबर्मे आणि शहर विभागाचे उपविभागीय पोलीस अधिकारी दिलीप टिपरसे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक नितीन देशमुख, सपोनि विशाल चिटणीस, उपनिरीक्षक दीपक मेढे, पोलीस हेडकॉन्स्टेबल बाळकृष्ण दौंड, साबीर शेख, विनोद बोरगे, विशाल दळवी तसेच पोलीस कॉन्स्टेबल संदिप शिरसाठ, सत्यजित शिंदे, सुरज कदम, शिरीष तरटे, अतुल कोतकर, रमेश शिंदे, अतुल लाटे, संकेत धिवर, वैभव काळे आणि आकाश काळे यांनी केली.

अहिल्यानगर जिल्हा बँकेच्या पहिल्याच संचालक मंडळ बैठकीत १ कोटींची मदत जाहीर

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

अहिल्यानगर– अहिल्यानगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या नवनिर्वाचित संचालक मंडळाने पहिल्याच बैठकीत दुष्काळग्रस्तांच्या मदतीसाठी एक कोटी रुपयांचा निधी देण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला. बँकेचे नवनिर्वाचित अध्यक्ष डॉ. सुजय विखे पाटील यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या बैठकीत उपाध्यक्ष रणजितसिंह देशमुख यांच्यासह संचालक मंडळाने या निर्णयाला सहमती दर्शवली. विशेष म्हणजे, जिल्हा बँक व बँकेच्या कर्मचाऱ्यांच्या एक दिवसाच्या वेतनाचाही सहभाग असणार आहे.

जिल्ह्यातील दुष्काळी परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन जिल्हा सहकारी बँक आणि बँकेच्या कर्मचाऱ्यांच्या वतीने मुख्यमंत्री सहायता निधीसाठी एक कोटी रुपयांची मदत जाहीर करण्यात आली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची वेळ घेऊन हा निधी त्यांच्याकडे अधिकृतपणे सुपूर्द करण्यात येणार आहे. बँकेच्या कर्मचाऱ्यांनीही आपल्या एक दिवसाच्या वेतनातून या मदतकार्यात योगदान देण्याची भूमिका घेतली आहे.



मदतीचा निर्णय घेताना बँकेच्या आर्थिक परिस्थितीचाही गांभीर्याने विचार करण्यात आला. बँकेचे आर्थिक स्थैर्य अबाधित राखण्याबरोबरच जिल्ह्यातील शेतकरी आणि दुष्काळग्रस्तांच्या मदतीसाठीही पुढाकार घेणे आवश्यक असल्याची भूमिका अध्यक्ष डॉ. सुजय विखे पाटील आणि संचालक मंडळाने घेतली. बँकेची आर्थिक क्षमता आणि आर्थिक शिस्त लक्षात घेऊनच मदतीचा निर्णय घेण्यात आला.

दुष्काळी परिस्थिती निर्माण झाल्यानंतर अहिल्यानगर जिल्हा सहकारी बँकेकडून आर्थिक मदत करण्याची परंपरा यापूर्वीही जपली गेली आहे. यंदाही त्याच सामाजिक बांधिलकीतून बँकेने पुढाकार घेत ही परंपरा कायम ठेवली आहे. बँकेच्या निधीसोबतच कर्मचाऱ्यांच्या एक दिवसाच्या वेतनाचा सहभाग हा या निर्णयातील महत्त्वाचा भाग ठरणार आहे.

शेतकऱ्यांचे हित, बँकेची आर्थिक शिस्त आणि सामाजिक बांधिलकी या तिन्ही बाबींचा समतोल साधत नवनिर्वाचित संचालक मंडळाने आपल्या पहिल्याच बैठकीत दुष्काळग्रस्तांच्या मदतीचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे जिल्हा बँकेच्या नव्या नेतृत्वाच्या कार्यकाळाची सुरुवात सामाजिक उत्तरदायित्वाच्या निर्णयाने झाली आहे.

छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियानाच्या राज्यस्तरीय समितीवर अशासकीय सदस्य म्हणून भाजपाचे माजी जिल्हाध्यक्ष प्रा. भानुदास बेरड

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

अहिल्यानगर– छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर अभियान टप्पा क्र. १ या अभियानाची अंमलबजावणी अधिक प्रभावी, लोकाभिमुख, कार्यक्षम व गतिमान करण्याच्या दृष्टीने दहा अशासकीय सदस्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. या नियुक्त महाराष्ट्राचे लोकप्रिय मुख्यमंत्री ना देवेंद्रजी फडणवीस व भाजपाचे प्रदेशाध्यक्ष आ रवींद्र जी चव्हाण, यांच्या मार्गदर्शनाखाली महाराष्ट्राचे महसूल मंत्री ना चंद्रशेखरजी बावनकुळे साहेब यांनी केले आहेत. त्यामध्ये अहिल्यानगर भारतीय जनता पार्टीचे माजी जिल्हाध्यक्ष व प्रदेश कार्यकारणी सदस्य प्रा भानुदास बेरड यांची नियुक्ती करण्यात आली आहे.



यामध्ये श्री. संजय कौडगे (नांदेड), श्री. अरविंद पाटील निलंगेकर (निलंगा जि. लातूर), श्री. नितीनकुमार भुतडा (जुनी गुजरी जि. यवतमाळ), श्री. संजय गाते (पुलगाव जि. वर्धा), श्री. वासुदेव काळे (पाटस रोड जि. पुणे), श्री. जगदीश मुळीक (पुणे), श्री. प्रकाश निकम (मुखडा जि. पालघर), श्री. परशुराम ढेकणे (रत्नागिरी), श्री. भानुदास बेरड (अहिल्यानगर) आणि श्री. बबनराव चौधरी (धुळे) यांचा समावेश आहे. या नियुक्तीमुळे प्रा भानुदास बेरड यांचे जिल्ह्यात सर्वत्र अभिनंदन केले जात आहे.

दुष्काळी मदतीची मर्यादा दोन हेक्टर वरून तीन हेक्टर करा



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

शेवगाव– महाराष्ट्रातील यंदाची दुष्काळी परिस्थिती अत्यंत गंभीर असून, १९७२ च्या दुष्काळाची आठवण करून देणारी आहे. अतिवृष्टीमुळे गतवर्षी खरीप पिकांचे मोठे नुकसान झाले, तर सन २०२६ मध्ये पावसाने पाठ फिरवल्याने शेतकऱ्यांची खरीप व रब्बी पिके पूर्णपणे जळून गेली आहेत. त्यामुळे शेतकरी आर्थिक संकटात सापडला असून, शासनाने दुष्काळी मदतीची मर्यादा दोन हेक्टरवरून तीन हेक्टरपर्यंत वाढवावी, अशी मागणी शेतकरी विकास मंडळ ट्रस्टचे अध्यक्ष शिवराज कापरे,यांच्यासह भीमराज बेडके , भाऊसाहेब सामृत, बाळासाहेब काळे , अशोक उगले यांनी महायुतीचे आमदार विठ्ठलराव लंघे यांना निवेदनाद्वारे केली आहे.

यंदा शेतकऱ्यांनी उसनवारी करून खरीप पेरणी केली होती. मात्र, पावसाअभावी पिके हातची गेल्याने शेतकऱ्यांचे आर्थिक गणित पूर्णपणे कोलमडले आहे. ■ पान ४ वर

कुकाण्यात घरातून गांजाची विक्री करणाऱ्या दोघांना बेड्या

साडेपाच लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त, एलसीबी व नेवासा पोलिसांची संयुक्त कारवाई

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

अहिल्यानगर– नेवासा तालुक्यातील कुकाणा येथे राहत्या घरातून गांजाची अवैध विक्री करणाऱ्या एकास स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने रंगेहात पकडले आहे. या कारवाईत पोलिसांनी ११.१८२ किलोग्रॅम गांजासह एकूण ५ लाख ६० हजार ७०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला असून, गांजाचा पुरवठा करणाऱ्या मुख्य आरोपीसही शेवगाव तालुक्यातून ताब्यात घेतले आहे.

पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांनी जिल्ह्यातील अवैध धंद्यांवर कठोर कारवाई करण्याचे आदेश दिले आहेत. त्यानुसार स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे यांनी विशेष पथक तयार केले होते. दि. १९ नोव्हेंबर रोजी हे पथक नेवासा पोलीस ठाण्याच्या हद्दीत माहिती घेत असताना, कुकाणा येथील मुलानीवाडा, जुम्मा मशिदीजवळ राहणारा शाहमद मेहबुब शेख (वय ४८) हा घरातून गांजाची विक्री करत असल्याची गोपनीय माहिती मिळाली.

पथकाने ही माहिती नेवासा पोलिसांना कळवून शेवगाव उपविभागीय पोलीस अधिकाऱ्यांच्या आदेशानुसार शेख याच्या घरावर संयुक्त छापा टाकला. घराच्या झडतीत तीन गोण्यांमध्ये भरलेला ५ लाख ५९ हजार १०० रुपये किमतीचा ११.१८२ किलो गांजा आढळून आला. यासोबतच १ हजार रुपयांचा वजन काटा, ३०० रुपयांची वजन मापे, २०० रुपयांचे स्टीलचे भांडे आणि १०० रुपयांच्या प्लास्टिक पिशव्या असा एकूण ५ लाख ६० हजार ७०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

ताब्यातील आरोपी शाहमद शेख याच्याकडे कसून चौकशी केली असता, हा गांजा मल्हारी मोहन बोरुडे (रा. मजलेशहर, ता. शेवगाव) याच्याकडून खरेदी केल्याची कबुली त्याने दिली. त्यावरून पथकाने तत्काळ शोध घेऊन बोरुडे यालाही अटक केली. दोन्ही आरोपींविरुद्ध नेवासा पोलीस ठाण्यात एनडीपीएस कायद्याच्या कलम ८(क), २०(ब), २०(२)(ब) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

तपास पथकात यांचा सहभाग

ही कारवाई पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे, सपोनि हरीश भोये, नेवासा पोलीस ठाण्याचे सपोनि अमोल पवार तसेच पोलीस अंमलदार बाळासाहेब नागरगोजे, रिचर्ड गायकवाड, विकास साळवे, अशोक लिपणे, शामसुंदर जाधव, मनोज साखरे व नंदिनी झिने यांच्या पथकाने पार पाडली.

ज्येष्ठ पत्रकार राजेंद्र त्रिमुखे यांचे निधन

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी



अहिल्यानगर– अहिल्यानगर शहरातील वीरशैव कक्कया ढोर समाजातील ज्येष्ठ पत्रकार राजेंद्र श्यामसुंदर त्रिमुखे यांचे आज अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले असून ढोर समाजातील एक हिरा हरपला असून समाजाची मोठी हानी झालेली आहे ,मूळ भिंगार येथील समता चौक ढोर गल्लीतील सेवानिवृत्त पोलीस हवालदार श्याम सुंदर किसन त्रिमूखे यांचे चिरंजीव राजेंद्र यांनी पत्रकारितेला सुरुवात करून राज्यातील विविध न्यूज चैनल आणि वृत्तपत्रातून कामे केली प्रामुख्याने सहारा न्यूज या टीव्ही चॅनलच्या माध्यमातून आपल्या पत्रकारितेला सुरुवात केली, नंतर टीव्ही नाईन, झी टीव्ही स्वतः चे न्यूज नगरी पोर्टल आणि आता सध्याला पोलीस न्यूज या वृत्तपत्राचे जिल्हा प्रतिनिधी म्हणून काम करत होते राजेंद्र त्रिमुखे हे अतिशय मनमिळावु स्वभावाचे होते, ढोर समाजातील एक आदर्श व्यक्ती म्हणून त्यांची ओळख होती त्यांचा आज दुपारी २ वाजता नालेगाव येथील अमरधाम येथे अंत्यविधी झाला. या अंत्यविधीस समाजातील विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते त्यावेळी, अहिल्या नगर शहराचे लाडके कार्यसम्राट आमदार संग्राम भैय्या जगताप, भारतीय जनता पार्टीचे प्रदेश पदाधिकारी अभय तात्या आगरकर ,वंचित बहुजन आघाडीचे योगेश साठे,नगरसेवक बाळासाहेब पवार, जेष्ठ पत्रकार, नगर सह्याद्रीचे मुख्य संपादक शिवाजीराव शिर्के , चर्मकार संघटनेचे सुरेश खामकर, बाबासाहेब त्रिंबके, यांनी श्रद्धांजली वाहिली असून, या अंत्यविधीस , विविध वृत्तपत्रांचे संपादक ,न्यूज चैनल चे जिल्हा प्रतिनिधी, पत्रकार बांधव,राजकीय, धार्मिक आणि सामाजिक क्षेत्रातील मान्यवर व्यक्ती, तसेच वीरशैव कक्कया ढोर समाजाचे सर्व समाज बांधव महिला भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते, ज्येष्ठ पत्रकार विठ्ठल शिंदे यांचे कै.राजेंद्र त्रिमुखे, हे मामेभाऊ असून, त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुली, भाऊजी दोन पुतणे आणि पोलीस कॉन्स्टेबल सौरव त्रिमुखे हे आहेत, यांच्या अंत्यविधीसाठी महाराष्ट्रातील सर्व समाज बांधव उपस्थित होते.

एसटी बसथांब्यांसाठी १ कोटी २० लाखांचा निधी मंजूर

आ. दातेंच्या पाठपुराव्याला यश

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

पारनेर– पारनेर नगर विधानसभा मतदारसंघातील ग्रामीण भागाच्या विकासाला प्राधान्य देत सर्वसामान्य नागरिकांच्या दैनंदिन अडचणी सोडविण्यासाठी सातत्याने प्रयत्नशील असलेले आमदार काशिनाथ दाते सर यांच्या पाठपुराव्याला आणखी एक महत्त्वपूर्ण यश मिळाले आहे. पारनेर तालुक्यातील सहा ठिकाणी सुसज्ज एसटी बसथांबे उभारण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या परिवहन विभागाने प्रशासकीय व वित्तीय मान्यता दिली असून, प्रत्येकी २० लाख रुपये याप्रमाणे एकूण १ कोटी २० लाख रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे.

शासन निर्णयानुसार महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या अहिल्यानगर विभागातील विविध ठिकाणी प्रवासी मार्ग निवारे उभारण्यासाठी एकूण १५ कोटी रुपयांच्या अंदाजपत्रकास मान्यता देण्यात आली आहे. यामध्ये पारनेर तालुक्यातील अळकुटी, निघोज, नारायण गव्हाण, देवीभोयरे, एमआयडीसी फाटा सुपा आणि पाडळी रांजणगाव या सहा ठिकाणांचा समावेश आहे. प्रत्येक बसथांब्यासाठी २० लाख रुपयांची तरतूद करण्यात आली आहे.



ग्रामीण भागातील विद्यार्थी, महिला, शेतकरी, शेतमजूर, नोकरदार आणि ज्येष्ठ नागरिक मोठ्या प्रमाणावर एसटी बससेवेचा वापर करतात. मात्र, अनेक ठिकाणी बसची प्रतीक्षा करताना प्रवाशांना उन्हात, पावसात उभे राहावे लागते. विशेषतः महिला, विद्यार्थी आणि ज्येष्ठ नागरिकांची यामुळे मोठी गैरसोय होते. ही बाब लक्षात घेऊन प्रवाशांच्या मूलभूत सुविधेचा प्रश्न प्राधान्याने हाती घेतला. संबंधित बसथांब्यांच्या मंजुरीसाठी सातत्याने पाठपुरावा करून शासनस्तरावर हा प्रश्न मार्गी लावण्यासाठी प्रयत्न केले.


आ. काशिनाथ दाते सर
(विधानसभा सदस्य)

रस्ते, पाणी, आरोग्य, शिक्षण, वीज आणि सार्वजनिक वाहतूक अशा मूलभूत प्रश्नांवर संबंधित विभागांशी समन्वय साधून सातत्याने पाठपुरावा करीत आहेत. नागरिकांची एखादी छोटीशी गैरसोयदेखील दूर व्हावी, जीवनमानात सकारात्मक बदल घडावा आणि ग्रामीण भागातील सुविधांचा दर्जा उंचावावा, लोकप्रतिनिधित्व म्हणजे केवळ ■ पान ४ वर

दै. आकर्षण निवडक

सद्गुरू श्री शंकर महाराज प्रकट दिन भक्तिमय वातावरणात साजरा

अहिल्यानगर - श्री सूर्यमुखी गुरुदत्त दिगंबर युवा विकास प्रतिष्ठान ट्रस्ट, दत्त कॉलनी, दातरंगे मळा, अहिल्यानगर यांच्या वतीने १७ नोव्हेंबर रोजी सद्गुरू श्री शंकर महाराज यांचा प्रकट दिन भक्तिमय वातावरणात साजरा करण्यात आला. सकाळी विधिवत रुद्राभिषेकाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. यावेळी १११ दत्तभक्तांनी श्रद्धापूर्वक शंकर गीता पारायण केले. त्यानंतर सद्गुरू श्री शंकर महाराज यांच्या पालखीची भक्तिमय मिरवणूक काढण्यात आली. भक्तांच्या उत्स्फूर्त सहभागाने परिसरात आध्यात्मिक वातावरण निर्माण झाले. महाप्रसादाने कार्यक्रमाची सांगता झाली. या कार्यक्रमाच्या निमित्ताने आगामी दत्त जयंती उत्सव २०२६ (२४ वे वर्ष) तसेच धार्मिक व सामाजिक उपक्रमांची माहिती देणाऱ्या महोत्सव पत्रिकेचे प्रकाशन करण्यात आले. यासोबतच सन २०२७ च्या दिनदर्शिकेचेही मान्यवरांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले. धार्मिक परंपरा जपत सामाजिक उपक्रमांच्या माध्यमातून समाजाला एकत्र आणण्याचा ट्रस्टचा प्रयत्न या आयोजनातून दिसून येत आहे.यंदाच्या दत्त जयंती महोत्सवानिमित्त रक्तदान शिबिर, सामूहिक हनुमान चालीसा पठण, गरजू विद्यार्थ्यांना सायकल वाटप, ह. भ. प. भोगडे महाराज यांचे प्रवचन, रुद्राभिषेक, होमहवन, श्री दत्तप्रभूंची पालखी मिरवणूक आदी विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. तसेच सुमारे पाच ते सहा हजार भाविकांसाठी महाप्रसादाची व्यवस्था करण्यात येणार आहे. धार्मिक कार्यक्रमांसोबत सामाजिक उपक्रमांना प्राधान्य देत गरजू व्यक्तींना मदतीचा हात देण्याचा संकल्प या उत्सवाच्या माध्यमातून करण्यात आला आहे. दत्त जयंती महोत्सव हा केवळ धार्मिक कार्यक्रम नसून भक्ती, सेवा, समर्पण आणि सामाजिक बांधिलकी जपणारा उपक्रम आहे. लोकसहभागातून साकारत असलेल्या या महोत्सवात भाविकांच्या सहकार्याला विशेष महत्त्व आहे. धार्मिक कार्यक्रमांसोबत गरजू विद्यार्थ्यांना सायकल वाटप, रक्तदान शिबिर यांसारखे सामाजिक उपक्रम राबविण्यासाठी आर्थिक सहकार्याची आवश्यकता आहे. त्यामुळे दानशूर व्यक्ती, उद्योजक, व्यापारी, सामाजिक कार्यकर्ते आणि दत्तभक्तांनी या धर्मकार्यामध्ये सहभागी होऊन सढळ हाताने देणगी द्यावी, असे आवाहन ट्रस्टच्या वतीने करण्यात आले आहे.ट्रस्टचे प्रमुख सदस्य श्री. दीपक गुंडू यांनी दत्तभक्तांना उत्सवाच्या आयोजनासाठी आर्थिक सहकार्य करण्याचे आवाहन केले. प्रत्येकाने आपल्या क्षमतेनुसार दिलेले योगदान महोत्सवाच्या आयोजनाला बळ देणारे ठरणार असून, भक्तांच्या सहकार्याने धार्मिक आणि सामाजिक उपक्रम अधिक व्यापक स्वरूपात राबविता येणार आहेत.



माळीवाडा येथील शंकर सावली मठाच्या वतीने शंकर महाराज प्रकट दिनानिमित्त शोभायात्रा संपन्न



अहिल्यानगर- सद्गुरू शंकर महाराज प्रकट दिनानिमित्त माळीवाडा येथील शंकर सावली मठाच्या वतीने विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते . त्यानिमित्त मठामध्ये आकर्षक अशी फुलांची सजावट करण्यात आली होती . तसेच प्रकट दीना निमित्त माळीवाडा परिसर येथून भव्य शोभायात्रा काढण्यात आली होती . ,घोडेस्वार ,पारंपारिक वाद्य ,फुलांनी सजवलेली पालखी मध्ये शंकर महाराज यांची मूर्ती अशा भव्य शोभायात्राचे ठीक ठिकाणी पुष्पवृष्टी करून स्वागत करण्यात येत होते.शोभायात्रा मार्गावर सुंदर रांगोळी काढली होती . हि शोभायात्रा ब्राह्मण गली ,येथील मठापासून सुरु होऊन बारातोटी कारंजा ,बंगाल चोकी,वसंत टॉकीज,कोठीची तालीम ,ढोर गली ,माळीवाडा चोक ,श्री विशाल गणेश मंदिर ,फुलसुंदर चोक मार्गे पुन्हा मठामध्ये समारोप करण्यात आला. तसेच यावेळी प्रकट दिनानिमित्त शंकर सावली मठ येथे दोन दिवस विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते . यामध्ये शंकर गीता पारायण,महाअभिषेक ,महा पालखी प्रदक्षिणा ,महाआरती ,तसेच महाप्रसादाचे हि आयोजन करण्यात आले होते . प्रकट दिन कार्यक्रम यशस्वीते साठी सर्व सेवेकरी परिश्रम घेत होते .या कार्यक्रमाचे नियोजन मठाधिपती कमलेश महाराज जंजाळे यांनी केले होते.

क्रांतिसूर्य बिरसा मुंडांचे उलगुलान देशाच्या स्वातंत्र्यासाठी– प्राचार्य डॉ.माहेश्वरी गावित



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

अहिल्यानगर– हिंद सेवा मंडळाच्या पेमराज सारडा महाविद्यालयात क्रांतिसूर्य बिरसा मुंडा यांच्या १५१ व्या जयंतीनिमित्त जनजातीय गौरव दिन साजरा करण्यात आला. प्राचार्य डॉ.माहेश्वरी गावित यांनी बिरसा मुंडा यांना पुष्पहार अर्पण करून प्रतिमा पूजन केले.यावेळी बोलताना गावित म्हणाल्या,'' भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील एका समर्पित क्रांतिकारक आदिवासी तरुणाचे नाव आहे बिरसा मुंडा.बिरसाचे क्रांतिकार्य हे केवळ आदिवासींसाठी नव्हते,तर सर्वांसाठी होते. बिरसाचे आंदोलन देशाच्या स्वातंत्र्यासाठी होते. बिरसा मुंडाने जल -जंगल -जमिनीवर आदिवासींचा अधिकार कायम राहावा यासाठी ब्रिटिश सत्तेविरुद्ध लढा दिला. उलगुलान हे बिरसाच्या मानवता लढ्याचे नाव होते.ज्या परिस्थितीत बिरसाने लोकयुद्ध लढले,त्याचा विचार करता बिरसाचे वेगळेपण मान्य करावेच लागते. म्हणूनच बिरसाचे क्रांतिकारी विचार भारतीय लोकशाहीला नवे वळण देण्यास सक्षम आहे. ''

या कार्यक्रमासाठी हिंद सेवा मंडळाचे अध्यक्ष ॲड.अनंत फडणीस,मानद सचिव सुमतीलाल कोठारी, कार्याध्यक्ष व वरिष्ठ महाविद्यालयाचे चेअरमन अनंत देसाई,कनिष्ठ महाविद्यालयाचे चेअरमन मधुसूदन सारडा,माजी मानद सचिव संजय जोशी,ज्येष्ठ मार्गदर्शक अजित बोरा,ब्रिजलाल सारडा,प्रा. ज्योतीताई कुलकर्णी,डॉ.पारस कोठारी,जगदीश झालानी यांनी शुभेच्छा दिल्या.

यावेळी डॉ.वर्षा कीर्तने,प्रा.डॉ. लक्ष्मीकांत येळवंडे, डॉ.किरणकुमार साळवे, डॉ.राजेंद्र कुंभार, डॉ.अर्चना क्षीरसागर आदी प्राध्यापक, प्राध्यापकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते . राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी प्रा.राजेंद्र देशमुख यांनी सूत्रसंचालन केले. तर डॉ. किरणकुमार साळवे यांनी आभार मानले.

आमदार रोहित पवार यांनी केलेल्या आरोपांची चौकशी व्हावी -ॲड. सुरेश लगड

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी



अहिल्यानगर– आपल्या राज्याचे उपमुख्यमंत्री स्व. अजितदादा पवार यांचा विमान अपघातात मृत्यू झाला. तो घातपात आहे की अपघात यावर अभ्यासू आमदार रोहित पवार साहेब यांनी गंभीर आरोप केलेले आहे. त्या सर्व आरोपांची खोलवर चौकशी झाली पाहिजे. स्व. अजितदादा यांच्या मृत्यू संदर्भात आमदार रोहित पवार साहेब यांनी संशय व्यक्त केला आहे. आमदार रोहित पवार साहेब यांनी आपल्या महाराष्ट्र राज्यातील पोलीस ठाण्यात फिर्याद देण्याचा प्रयत्न केला असता त्यांची फिर्याद घेण्याचे संबंधित पोलीस ठाण्याने नाकारले. ग्रुहखाते हे मुख्य मंत्री महोदय यांच्याकडे असताना महाराष्ट्रातील पोलीस अधिकारी फिर्याद घेण्याचे टाळतात ही खुप लाजीरवाणी गोष्ट आहे. अखेर आमदार रोहित पवार साहेब यांना कर्नाटक राज्यात जाऊन आपली फिर्याद दाखल करावी लागली. त्याचाही तपास अद्याप पावेतो पुर्ण झाला नाही. स्व. अजितदादा पवार याचा अपघात असेल तर त्याची चौकशी करायला का घाबरता? का ९ महीने लागले. आमदार रोहित पवार साहेब हे एक अभ्यासू आमदार आहेत. त्यांचे चुलते मयत झाले आहे. साहजिकच आमदार रोहित पवार साहेब यांना दु:ख झालेले आहे. त्यामुळे आमदार रोहित पवार साहेब यांनी केलेल्या आरोपांची मुख्य मंत्री महोदय यांनी निः पक्षपातीपणे खोलवर चौकशी करावी अशी मागणी अहिल्यानगरचे जेष्ठ विधीज्ञ ॲड सुरेश लगड यांनी केली आहे.

१९ वे राज्यस्तरीय महात्मा फुले प्रबोधन मराठी साहित्य संमेलन सासवड करिता.. कथालेखक बाळासाहेब देशमुख निमंत्रित

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी



अहिल्यानगर– अखिल भारतीय मराठी साहित्य संशोधन परिषद पुणे आयोजित,१९ वे राज्यस्तरीय महात्मा फुले प्रबोधन मराठी साहित्य संमेलन सासवड येथे दिनांक २७ नोव्हेंबर २०२६ रोजी, आचार्य अत्रे सांस्कृतिक भवन सासवड येथे संपन्न होत आहे. संमेलनाध्यक्षपदी जेष्ठ साहित्यिक, कवी इंद्रजीत भालेराव यांची निवड झालेली आहे.

सदर राज्यस्तरीय साहित्य संमेलनात , अहिल्यानगरचे कथालेखक बाळासाहेब देशमुख यांना कथाकथन कार्यक्रमासाठी निमंत्रित करण्यात आले आहे. साहित्य संमेलन आयोजक माननीय ज्येष्ठ साहित्यिक दशरथ यादव यांनी पत्र पाठवून, कथालेखक श्री बाळासाहेब देशमुख यांना कथाकथन कार्यक्रमाकरिता निमंत्रित केलेले आहे.कथालेखक बाळासाहेब देशमुख, कथाकथन कार्यक्रमात पापी पेट का सवाल है ही दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांच्या जीवनावर ची कथा रसिक प्रेक्षकांसमोर सादर करणार आहेत. बाळासाहेब देशमुखांचे कथाकथन आजवर अहिल्यानगर जिल्ह्यात ५०० प्रयोग पूर्ण झालेले आहेत. शिवाय विविध आकाशवाणी केंद्रावर १२० कथा प्रसारित झालेल्या आहेत. राज्यस्तरीय साहित्य संमेलन मध्ये त्यांचे आजवर ३९ कथाकथन प्रयोग पूर्ण झालेले आहेत.. रंग माझा वेगळा, माणसे अशी.. अन् तशीही... , माणसं भिंगातून... , मोसाइक हे चार कथासंग्रह प्रसिद्ध झालेले आहेत. त्यांचा पाचवा कथासंग्रह बोबडे बोल.. अन् विचार खोल . लवकरच प्रसिद्धीच्या मार्गावर आहे. त्यांच्या या निवडीबद्दल ज्येष्ठ साहित्यिक चंद्रकांत पालवे, बाबुराव उपाध्ये , शशिकांत शिंदे , दादासाहेब कोते , कवयित्री सुरेखा घोलप, डॉ बाळासाहेब कोठुळे, आत्माराम शेवाळे यांनी अभिनंदन केले आहे.

ज्ञानप्रबोधिनीचे सामाजिक कार्य जाणून घेण्याची अहिल्यानगरवासियांना संधी!

नियोजनासाठी येत्या शनिवारी बैठक, महिलांना उपस्थितीचे आवाहन

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

अहिल्यानगर– शैक्षणिक आणि सामाजिक क्षेत्रात विविधांगी काम करणारी पुण्यातील ज्ञान प्रबोधिनी संस्थेचे कार्य आता अहिल्यानगर शहरातही सुरू होणार आहे. या संस्थेचे काम सर्वांपर्यंत पोहोचावे, त्या कामाची ओळख व्हावी आणि भविष्यात अहिल्यानगरमध्ये ज्ञानप्रबोधिनीच्या काही कार्यदिशांतील काम सुरू करता यावे, या हेतूने महिलांसाठी विस्तार मेळावा येत्या शनिवारी (२१ नोव्हेंबर) दुपारी २ ते ४ या वेळेत नगरमधील आयुर्वेद व्यासपीठ सभागृहात (धर्माधिकारी मळा, बालिकाश्रम रस्ता, सावेडी) घेण्यात येणार आहे.

अहिल्या नगर शहरालाही उत्तम शैक्षणिक व सांस्कृतिक वारसा लाभलेला आहे. इथल्या अनेक महिला या विविध क्षेत्रात कार्यरत आहेत. त्यांचा एकमेकींना परिचय व्हावा व एक चांगली जोडणी व्हावी यासाठी महिलांनी या मेळाव्याला आवर्जून उपस्थित रहावे, असे आवाहन ज्ञानप्रबोधिनी विस्तार मेळाव्याच्या समितीने केले आहे.

या मेळाव्याच्या निमित्ताने माहिती देताना समितीद्वारे स्पष्ट करण्यात आले की, महिला उत्साहाने वेगवेगळ्या भूमिका निभावत असतात. त्या अनुषंगाने येणारी जबाबदारी, अडचणी यांना तोंड देत असतात. क्वचित कधीतरी मिळणार्या कौतुकाच्या थापेने मोहरूनही जातात. घरातल्या प्रत्येक व्यक्तीचे स्वतंत्र सामाजिक, शैक्षणिक, व्यावसायिक व वैयक्तिक वर्तुळ असतं, तसं महिलांचेही असतं. पण आयुष्याच्या एका टप्प्यावर काहीतरी नवीन शिकावं असं वाटतं, नव्याने काही गोष्टी करून बघाव्यात असं वाटतं. समाजाचं ऋण फेडावं वाटतं, आध्यात्मिकता जपावी वाटते. यामुळे यानिमित्ताने नव्यानं वैचारिक बांधणी करण्याच्या हेतूने मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. तेथे एकमेकींना समजून घेताना अहिल्यानगर शहरात विविध सामाजिक उपक्रम राबवण्याचेही नियोजन करण्यात येणार आहे.

अहिल्यानगर आणि पुणे आता जणू काही एकमेकांना जोडलंच गेलं आहे. त्यामुळे बहुतांश महिलांना ज्ञान प्रबोधिनी शाळा माहीत असू शकते. या पार्श्वभूमीवर, ज्ञान प्रबोधिनी ही संस्था अजून कोण कोणत्या क्षेत्रांमध्ये कार्य करते हे एक स्त्री म्हणून, एक पालक म्हणून, एक समाजाचा घटक म्हणून जाणून घेऊयात, असे समितीने स्पष्ट केले आहे. तसेच स्त्रियांमध्ये मानसिक स्वास्थ्यासाठी जाणीव जागृती निर्माण करणारा मनोवेध* हा कार्यक्रम या मेळाव्यात होईल. अधिक माहितीसाठी व मेळाव्यात सहभागी होण्यासाठी संपर्क : रश्मी देशपांडे-जोशी - ९९२२३७९३२९, स्मिता देशमुख-बेलापूरकर - ९९२२४०९८०७, अपर्णा ब्रह्मे- पुरोहित- ९०११६६८९९० व सुलभा नवले-कुलकर्णी - ९६०४१२९४४५.

जिल्हा उपनिबंधक कार्यालयातील कर्मचाऱ्यांच्या छळाविरोधात कास्ट्राईब महासंघ आक्रमक

। २५ नोव्हेंबरला जिल्हा उपनिबंधक कार्यालयावर आंदोलन
। कर्मचाऱ्यांना प्रशासकीय त्रास व असुरक्षिततेचा आरोप

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी



अहिल्यानगर– जिल्हा उपनिबंधक कार्यालयातील मागासवर्गीय तसेच इतर कर्मचाऱ्यांना मानसिक त्रास आणि विविध प्रकारच्या प्रशासकीय अडचणींना सामोरे जावे लागत असल्याच्या तक्रारी महाराष्ट्र राज्य कास्ट्राईब महासंघाला वारंवार प्राप्त होत आहेत. या तक्रारींवर संबंधित विभागाकडे पाठपुरावा करुनही कोणतीही ठोस सुधारणा किंवा कार्यवाही होत नसल्याचा आरोप महासंघाने केला आहे. या प्रशासकीय मनमानीविरोधात महासंघाने आक्रमक भूमिका घेतली असून, येत्या २५ नोव्हेंबर रोजी जिल्हा उपनिबंधक कार्यालयासमोर तीव्र आंदोलन करण्यात येणार असल्याची माहिती महासंघाचे राज्याध्यक्ष एन. एम. पवळे यांनी दिली.

कार्यालयातील कर्मचाऱ्यांना बाहेरील व्यक्तींकडून होणाऱ्या त्रासापासून संरक्षण देणे हे संबंधित कार्यालयप्रमुखांचे प्राथमिक कर्तव्य आहे. मात्र, कर्मचाऱ्यांना संरक्षण देण्याऐवजी जिल्हा उपनिबंधकांकडून त्यांच्याच विरोधात खातेनिहाय चौकशा लावणे, लेखी जबाब मागविणे आणि विविध प्रशासकीय प्रक्रियांद्वारे त्रास दिला जात असल्याचा आरोप महासंघाने केला आहे. या प्रकारामुळे कर्मचाऱ्यांना नियमित कार्यालयीन कामकाज करताना मानसिक तणावाला सामोरे जावे लागत असून, कार्यालयातील वातावरणही अस्वस्थ बनल्याचे महासंघाचे म्हणणे आहे.

विशेष म्हणजे, कार्यालयातील काही कर्मचाऱ्यांनी बाहेरील व्यक्तींकडून होणाऱ्या त्रासासंदर्भात पोलीस खात्याकडे लेखी तक्रारी दाखल केल्या आहेत. या तक्रारींची माहिती जिल्हा उपनिबंधकांना देण्यात आली असून, संबंधित कर्मचाऱ्यांना पोलीस संरक्षण मिळवून देण्यासाठी आवश्यक कार्यवाही करावी, अशी मागणीही करण्यात आली होती. यासंदर्भात जिल्हा उपनिबंधकांशी प्रत्यक्ष चर्चाही करण्यात आली होती. मात्र, या प्रकरणात अद्याप कोणतीही ठोस कार्यवाही झाल्याचे महासंघाला कळविण्यात आलेले नाही. प्रशासनाच्या या दुर्लक्षामुळे कर्मचाऱ्यांमध्ये नाराजी वाढत असल्याचे पवळे यांनी सांगितले.

या पार्श्वभूमीवर महासंघाने विविध मागण्या पुढे केल्या आहेत. अहिल्यानगर जिल्ह्यातील सहकार विभागातील कर्मचाऱ्यांविरोधात नियमबाह्य पद्धतीने लावण्यात आलेल्या खातेनिहाय चौकशा तातडीने रद्द कराव्यात, कर्मचाऱ्यांविरोधात चुकीची माहिती देऊन किंवा तक्रार अर्जांच्या माध्यमातून त्यांना त्रास देण्याचे प्रकार त्वरित थांबवावेत, तसेच जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, अहिल्यानगर यांनी संबंधित कर्मचाऱ्यांना पोलीस खात्यामार्फत आवश्यक संरक्षण मिळवून द्यावे, अशी मागणी करण्यात आली आहे.

तसेच सहाय्यक सहकारी अधिकारी डी. डी. पारधे आणि वरिष्ठ लिपिक श्रीमती ए. पी. खरपुडे यांनी २१ सप्टेंबर २०२६ रोजी कोतवाली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे. या दाखल गुन्ह्याची योग्य चौकशी करून संबंधितांना न्याय मिळण्यासाठी आवश्यक कायदेशीर कार्यवाही व्हावी, यासाठी प्रशासनाने सहकार्य करावे, अशीही महासंघाची मागणी आहे.

कर्मचाऱ्यांच्या तक्रारींची दखल घेऊन प्रशासनाने तातडीने योग्य निर्णय घ्यावा आणि प्रलंबित प्रश्न मार्गी लावावेत, अशी भूमिका महासंघाने घेतली आहे. मात्र, मागण्यांबाबत सकारात्मक कार्यवाही न झाल्यास २५ नोव्हेंबर रोजी जिल्हा उपनिबंधक कार्यालयासमोर तीव्र आंदोलन करण्याचा इशारा देण्यात आला आहे.

कार्तिक मासानिमित्त समर्पण सेवा संस्थेच्या महिलांची गोशाळेत नारायण प्रार्थना

गोमातेला चारा अर्पण करून आरोग्यदायी जीवनाचा संकल्प! धन्वंतरी मंत्राचा जागर; भक्तीभावातून गोसेवेचा संदेश

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी



अहिल्यानगर– कार्तिक मासाचे धार्मिक आणि आध्यात्मिक महत्त्व लक्षात घेऊन समर्पण सेवा संस्थेच्या वतीने कुष्ठधाम रोड, सावेडी येथील सतनाम साक्षी गोशाळेत भक्तिमय वातावरणात नारायण प्रार्थनेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी संस्थेच्या महिला सदस्यांनी विधिवत पूजा-अर्चना करून श्री नारायणाचे स्मरण केले. तसेच धन्वंतरी मंत्राचे सामूहिक उच्चारण करत सर्वांच्या निरोगी, निरामय आणि दीर्घायुष्यासाठी प्रार्थना केली.

कार्तिक मास हा भक्ती, साधना, दानधर्म आणि सेवाभाव जोपासण्याचा पवित्र महिना मानला जातो. या भावनेतून समर्पण सेवा संस्थेच्या महिलांनी गोशाळेत एकत्र येत धार्मिक उपक्रमात सहभाग घेतला. नारायण प्रार्थनेनंतर गोमातेची विधिवत पूजा करून गोशाळेत गोपरिक्रमा करण्यात आली. यावेळी गोशाळेतील जनावरांना चारा वाटप करून गोसेवेचा आनंदही अनुभवला.

यावेळी समर्पण सेवा संस्थेच्या अध्यक्षा रूपा पंजाबी, जागृती ओबेरॉय, शशी आनंद, अंकिता जग्गी, मीनू चड्ढा, किरण छाब्रा, सुमन सहानी, कोमल सहानी, रीटा खन्ना, सरोज गुर्ली, रेखा पावा, पूनम खुल्लर, वर्षा तलवाड, बसंत वधवा, ज्योती पारेख, भाग्यरेखा पिंपळकर, चेतना गुगळे, रेखा खोसला आदी महिला उपस्थित होत्या.

केवळ धार्मिक विधीपुरते मर्यादित न राहता मुक्या प्राण्यांप्रती प्रेम, करुणा आणि संवेदनशीलता व्यक्त करण्याचा संदेश या उपक्रमातून देण्यात आला. गोसेवा ही भारतीय संस्कृतीतील महत्त्वाची परंपरा असून, प्राणीमात्रांप्रती दया आणि सेवाभाव जोपासणे ही प्रत्येकाची सामाजिक जबाबदारी असल्याची भावना यावेळी महिलांनी व्यक्त केली.

यावेळी संस्थेच्या अध्यक्षा रूपा पंजाबी म्हणाल्या की, ''कार्तिक मास हा भक्ती, श्रद्धा, सेवा आणि आत्मिक शुद्धतेचा संदेश देणारा पवित्र महिना आहे. या महिन्यात परमेश्वराचे स्मरण करण्याबरोबरच समाजातील प्रत्येक घटकाप्रती आपले कर्तव्य पार पाडणेही तितकेच महत्त्वाचे आहे. नारायण प्रार्थना आणि धन्वंतरी मंत्राच्या सामूहिक उच्चारणातून सर्वांना उत्तम आरोग्य, सुख-समृद्धी आणि निरोगी जीवन लाभावे, अशी आम्ही प्रार्थना करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले.

गोमातेची सेवा ही केवळ धार्मिक परंपरा नसून त्यामागे प्रेम, कृतज्ञता आणि निस्वार्थ सेवाभावाची भावना आहे. मुक्या प्राण्यांची भूक भागविणे, त्यांची काळजी घेणे आणि त्यांच्याप्रती माणुसकी जपणे हे प्रत्येकाचे कर्तव्य आहे. समाजसेवा करताना माणसांबरोबरच पशुपक्ष्यांप्रतीही संवेदनशीलता असणे आवश्यक आहे.

समर्पण सेवा संस्थेच्या माध्यमातून महिलांमध्ये सेवाभाव, सामाजिक बांधिलकी आणि आध्यात्मिक विचारांची रुजवणूक करण्याचा आमचा प्रयत्न असल्याचेही त्यांनी सांगितले.

आकर्षण हे सायं. दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक विजय शामराव सांगळे यांनी दैनिक आकर्षण प्रिंटर्स , प्लॉट क्र. ९२, भगवान बाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, अहिल्यानगर (महानगरपालिका) अहिल्यानगर ४१४००३ (महाराष्ट्र) येथे (मुद्रीत) छापुन आकर्षण ऑफिस- प्लॉट नं. ९२, भगवानबाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, नगर-मनमाड रोड, अहिल्यानगर ४१४००३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक विजय शामराव सांगळे, व्यवस्थापक तुकाराम कामटे, मुख्य कार्यालयाचा फोन नंबर - ७७७६८१२८११. ई-मेल: dainikaakarshan@gmail.com. (* पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी यांच्यावर राहील.) (वाद अहिल्यानगर न्यायालयीन कक्षेत)

The Evening Daily Aakarshan is printed by the owner, printer, publisher Vijay Shamrao Sangale at DAINIK AKARSHAN PRINTERS, plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar, 414003 (Maharashtra) and Published at plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar 41403 (Maharashtra). "Editor - Vijay Shamrao Sangale, Manager - Tukaram Kamte, Phone no. of main office-7776812811. Email - dainikaakarshan@gmail.com ("The responsibility under the PRB Act will be on him.)

दै. आकर्षण निवडक

चाय स्टॉप बन मस्का बेकर्सचा शुभारंभ उत्साहात



अहिल्यानगर - नगर-कल्याण रोडवरील नेप्ती फाटा येथील सागर भेळच्या शेजारी सुरू करण्यात आलेल्या 'चाय स्टॉप बन मस्का बेकर्स' या नवीन व्यवसायाचा शुभारंभ आमदार संग्राम जगताप यांच्या हस्ते करण्यात आला .यावेळी श्री विशाल गणपती मंदिरचे महंत योगी संगमनाथ जी महाराज , गुरुवर्य औघड पीर नौमीनाथजी , मस्तनाथजी महाराज, मलंगनाथजी महाराज आणि शैलेंद्रनाथजी महाराज आदींसह नगरसेवक अविनाश घुले,संचालक ओम खरपुडे,केतन खरपुडे,राजू खरपुडे,सुभाष होळकर आदी उपस्थित होते यावेळी बोलताना आमदार संग्राम जगताप म्हणाले की, आजच्या स्पर्धे च्या युगात तरुणांनी नोकरीच्या मागे न लागता स्वतःचे व्यवसाय उभारण्याची मानसिकता ठेवली पाहिजे. व्यवसाय सुरू करण्यासाठी जिद्द, मेहनत, सातत्य आणि ग्राहकांचा विश्वास या गोष्टी अत्यंत महत्त्वाच्या आहेत. छोट्या व्यवसायातूनही मोठी प्रगती साधता येते. त्यासाठी दर्जेदार सेवा आणि ग्राहकांशी जिव्हाळ्याचे संबंध निर्माण करणे आवश्यक आहे.ते पुढे म्हणाले की, अहिल्यानगर शहराचा विस्तार झपाट्याने होत असून शहराच्या विविध भागांत नवीन व्यवसाय आणि रोजगाराच्या संधी निर्माण होत आहेत. स्थानिक तरुणांनी या संधींचा लाभ घेत उद्योजकतेकडे वळावे. चाय स्टॉप बन मस्का बेकर्स च्या माध्यमातून खरपुडे परिवाराने व्यवसाय क्षेत्रात टाकलेले हे पाऊल कौतुकास्पद असून या व्यवसायाला ग्राहकांचा चांगला प्रतिसाद मिळेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. यावेळी संचालक ओम खरपुडे यांनी प्रास्ताविक करून उपस्थितांचे स्वागत करून चाय स्टॉप बन मस्का बेकर्स सुरू करण्यामागील संकल्पना आणि उद्देश स्पष्ट केला. ग्राहकांना चांगल्या दर्जाचे चहा, बन मस्का तसेच बेकरी पदार्थ उपलब्ध करून देण्याचा आमचा प्रयत्न राहणार आहे. ग्राहकांचा विश्वास संपादन करून गुणवत्तापूर्ण सेवा देण्यास आम्ही प्राधान्य देऊ. सर्वांच्या सहकार्याने व्यवसायाची यशस्वी वाटचाल करण्याचा आमचा मानस असल्याचे त्यांनी सांगितले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन बाळासाहेब साखरे यांनी तर आभार केतन खरपुडे यांनी केले. यावेळी राजू खरपुडे, अक्षय खरपुडे यांनी उपस्थितांचे स्वागत केले.

राष्ट्रीय सुवर्णपदक विजेत्या सलोनी प्रसादचा सन्मान



अहिल्यानगर- जम्मू-काश्मीर येथे आयोजित ७० व्या शालेय राष्ट्रीय तायक्वांदो स्पर्धेत सुवर्णपदक पटकावणाऱ्या अहिल्यानगरच्या कु. सलोनी उमेश प्रसाद हिचा सामाजिक कार्यकर्ते तथा युवा नेतृत्व सागर भाऊ भिंगारदिवे यांच्या हस्ते पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला.सलोनीने राष्ट्रीय स्तरावर मिळविलेल्या यशामुळे अहिल्यानगर जिल्ह्याचा नावलौकिक वाढविला असून, तिचे हे यश इतर खेळाडूंसाठी प्रेरणादायी असल्याचे सागर भाऊ भिंगारदिवे यांनी सांगितले. यावेळी त्यांनी सलोनीला पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. तसेच तिचे मुख्य प्रशिक्षक गणेश धिवर, प्रशिक्षक सुनील धिवर आणि ऋषिकेश पोपळघट यांच्या मेहनतीचे व मार्गदर्शनाचेही कौतुक केले. याप्रसंगी प्रसिद्ध रील स्टार सुमित भालेराव, अभिजीत तांबे, वैभव साळवे, सूरज पारधे आदी उपस्थित होते. उपस्थितांनी सलोनीचे अभिनंदन करून तिच्या यशाचे कौतुक केले.

इंदिरा गांधी यांच्या जयंतीनिमित्त महानगरपालिकेत अभिवादन

मनपा अधिकारी–कर्मचाऱ्यांनी घेतली समता व बंधुभावाची शपथ



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

अहिल्यानगर– माजी पंतप्रधान स्वर्गीय इंदिरा गांधी यांच्या जयंतीनिमित्त अहिल्यानगर महानगरपालिकेच्या वतीने त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी उपस्थित अधिकारी व कर्मचाऱ्यांनी समता आणि बंधुभावाची शपथ घेतली.

महानगरपालिकेत आयोजित या कार्यक्रमप्रसंगी उपायुक्त मेहर लहारे, शेखर देशपांडे, सोनू चौधरी यांच्यासह अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. यावेळी सर्वांनी समता, बंधुता आणि सामाजिक एकोपा जपण्याची शपथ घेतली.

याप्रसंगी उपायुक्त मेहर लहारे म्हणाले की, देशाच्या माजी पंतप्रधान स्वर्गीय इंदिरा गांधी यांचे देशाच्या जडणघडणीत मोठे योगदान आहे. कृषी, शिक्षण, बँकिंग, परराष्ट्र धोरण, अर्थकारण आणि संरक्षण अशा विविध क्षेत्रांत त्यांनी उल्लेखनीय कामगिरी केली. देशाच्या विकासप्रक्रियेत त्यांचे योगदान महत्त्वपूर्ण असून, त्यांच्या कार्याचे स्मरण करणे आवश्यक आहे, असे त्यांनी सांगितले.

राधा-कृष्ण मंदिरात छप्पन भोग अन्नकोट उत्सवाचा भक्तिमय सोहळा

छप्पन भोगांच्या नैवेद्याने मंदिर सजले; भजन–कीर्तनातून भक्तिरसाची अनुभूती महाआरतीने वातावरण दुमदुमले!; अन्नकोट महोत्सवाला भाविकांची मोठी उपस्थिती



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

अहिल्यानगर– शहरातील सर्जेपुरा येथील पंजाबी सनातन धर्मसभेच्या राधा-कृष्ण मंदिरात छप्पन भोग अन्नकोट उत्सव मोठ्या भक्तिभावाने आणि उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. भगवान श्रीकृष्णाला विविध प्रकारच्या मिठाई, फराळ आणि पारंपरिक खाद्यपदार्थांचा छप्पन भोग अर्पण करून महाआरती करण्यात आली. या धार्मिक सोहळ्याला शीख व पंजाबी समाजातील भाविकांसह महिला आणि शहरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून दर्शनाचा व प्रसादाचा लाभ घेतला.

उत्सवाच्या प्रारंभी मंदिर परिसरात भजन-कीर्तनाचा भक्तिमय कार्यक्रम रंगला. गायक गिरीराज जाधव यांनी विविध भक्तिगीतांचे सादरीकरण करून उपस्थितांना भक्तिरसात तल्लीन केले. 'राम राम सीताराम...', 'देना हो तो दीजिये जन्म जन्म का साथ...', 'महाकाल सरकार मेरे...' यांसारख्या भक्तिगीतांनी कार्यक्रमात रंगत आणली. तर 'ओ पालनहारे...' या गीताच्या सादरीकरणाने संपूर्ण मंदिर परिसर भक्तिमय झाला. भगवान श्रीकृष्णाच्या गीतांनी वातावरणात चैतन्य निर्माण केले. उपस्थित महिला आणि भाविकांनीही भक्तिगीतांचा मनमुराद आनंद घेतला.

दरवर्षी गोवर्धन पूजेनंतर राधा-कृष्ण मंदिरात अन्नकोट महोत्सवाचे आयोजन करण्याची परंपरा आहे. यंदाही या परंपरेचे पालन करत भाविकांनी विविध प्रकारचे गोड पदार्थ, मिठाई, फराळ आणि पारंपरिक खाद्यपदार्थ मंदिरात आणले होते. या सर्व पदार्थांची आकर्षक पद्धतीने मांडणी करून भगवान श्रीकृष्णासाठी छप्पन भोगाचा भव्य नैवेद्य तयार करण्यात आला. भक्तांनी श्रद्धापूर्वक अर्पण केलेल्या या नैवेद्यामुळे मंदिरातील वातावरण अधिकच प्रसन्न आणि मंगलमय झाले होते.

यानंतर पंजाबी सनातन धर्मसभेचे ट्रस्टचे अध्यक्ष राकेश गुप्ता, विश्वस्त मंडळातील सदस्य आणि प्रमुख मान्यवरांच्या हस्ते भगवान श्रीकृष्णाची विधिवत महाआरती करण्यात आली.

हिंदू मोची समाजाच्या प्रलंबित प्रश्नांना प्राधान्याने मार्गी लावणार – आमदार संग्राम जगताप

हिंदू मोची समाजसेवा संघाच्या वतीने आमदार संग्राम जगताप यांचा सत्कार



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

अहिल्यानगर– समाजामध्ये वावरत असताना प्रत्येकाने समाजाचे काहीतरी देणे लागते, या भावनेतून सर्वांनी सामाजिक कार्यात योगदान दिले पाहिजे. हिंदू मोची समाजाने एकत्रित येऊन वारुळाचा मारुती परिसरात जागा खरेदी केली असून, त्या ठिकाणी समाजोपयोगी उपक्रम राबविण्यात येणार आहेत. समाजाच्या कार्यामध्ये राजकारण न आणता सर्वांनी एकत्रित येऊन हिंदू धर्माचे सण-उत्सव मोठ्या उत्साहात साजरे करावेत, असे प्रतिपादन आमदार संग्राम जगताप यांनी केले.

अहिल्यानगर हिंदू मोची समाजसेवा संघाच्या वतीने समाजाचे विविध प्रश्न मार्गी लावल्याबद्दल आमदार संग्राम जगताप यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी ते बोलत होते. आमदार जगताप म्हणाले की, पूर्वी शहरातील अनेक रस्ते केवळ विकास आराखड्याच्या नकाशावर होते. मात्र, राज्य शासनाच्या माध्यमातून निधी उपलब्ध करून हे रस्ते प्रत्यक्षात उतरविण्याचे काम करण्यात आले. वारुळाचा मारुती परिसर अनेक वर्षांपासून विकासकामांच्या दृष्टीने दुर्लक्षित होता. या परिसरातील रस्त्यांची कामे तसेच सीना नदीवरील पुलाचे काम मार्गी लावण्यात आले आहे. दातरंगे मळा परिसरापासून बायपासपर्यंतच्या रस्त्याचे काम पूर्णत्वास गेल्याने नागरिकांच्या दळणवळणाचा प्रश्न सुटण्यास मदत झाली आहे. जैनसमाजाच्या एकत्रित प्रयत्नांतून शहरात आनंद ऋषी हॉस्पिटल उभे राहिले. या रुग्णालयाच्या माध्यमातून नागरिकांना चांगल्या आरोग्य सुविधा उपलब्ध होत आहेत. इतर समाजांनीही या उपक्रमाचा आदर्श घेऊन सामाजिक कार्यासाठी पुढाकार घ्यावा. अशा प्रयत्नांतून सर्वसामान्य नागरिकांचे प्रश्न मार्गी लागण्यास मदत होते. हिंदू मोची समाजाचे जे प्रश्न अद्याप प्रलंबित आहेत, ते सोडविण्यासाठी पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या माध्यमातून प्रयत्न केले जातील. तसेच राज्य शासनाकडेही याबाबत पाठपुरावा करण्यात येईल, अशी ग्वाही आमदार जगताप यांनी दिली.

यावेळी हिंदू मोची समाजसेवा संघाचे ॲड. अविनाश साखला म्हणाले की, हिंदू मोची समाजाचे अनेक प्रश्न प्रलंबित होते. ते मार्गी लावण्यासाठी आमदार संग्राम जगताप यांनी सहकार्य केले. त्याबद्दल समाजाच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला. यापुढील काळातही समाजाचे प्रश्न सोडविण्यासाठी ते सहकार्य करतील, अशी अपेक्षा आहे. वारुळाचा मारुती परिसरात समाजाच्या वतीने सामाजिक भवन उभारण्यात येणार असून, या भवनाच्या माध्यमातून समाजबांधवांची सेवा करण्याचा प्रयत्न राहणार आहे.

या सत्कार सोहळ्याप्रसंगी रतनलाल पवार, सुभाष बायड, मनोहर चौहान, किरण सोनग्रा, नरेंद्र गोयल, अरुणाताई गोयल, संतोष गोयल, चंपालाल सोनग्रा, बालकिशन गोयल, पवन सोनग्रा, मगन सिसोदिया, चंदन पवार, कमलेश सोनग्रा, दीपक सोनग्रा, ॲड. अविनाश साखला, अमित गोयल, मनीष सोनग्रा, बिपिन पीडीयार, राजेश पीडीयार, रामेश्वर चव्हाण, प्रितेश सोनग्रा, ॲड. गणेश गोंडाळ, सागर देवकर, रवी साखला आदींसह समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

ब्रह्माकुमारी ध्यान मंदिराच्या संरक्षक भिंतीच्या काही भागावर महापालिकेचा हातोडा

पाडकामाला साध्वींचा तीव्र विरोध; कारवाई न करता पथक परतले । ध्यान मंदिराच्या जागेवरून महापालिका विरुद्ध ब्रह्माकुमारी संस्था; पोलीस संरक्षणाची मागणी

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

अहिल्यानगर– महावीरनगर, सावेडी येथील प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालयाच्या ध्यान मंदिर परिसरातील ब्रह्माभोजन व ध्यानधारणेसाठी वापरण्यात येणाऱ्या जागेच्या संरक्षक भिंतीचा काही भाग महापालिकेच्या अतिक्रमण निर्मूलन विभागाने पाडल्याने बुधवारी (दि. १८ नोव्हेंबर) सायंकाळी परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले. या कारवाईला ध्यान मंदिरातील महिला साध्वींनी तीव्र विरोध केला. अखेर ११२ नंबरवर कॉल करुन साध्वींनी पोलिसांना पाचारण केले, त्यानंतर पुढील कारवाई थांबविण्यात आली. या प्रकरणी साध्वींनी महापालिकेच्या कारवाईविरोधात लेखी तक्रार देत पोलीस संरक्षणाची मागणी केली आहे.

बुधवारी सायंकाळी सुमारे पाच वाजण्याच्या सुमारास महापालिकेच्या अतिक्रमण विभागाच्या पथकाने ध्यान मंदिर परिसरातील संरक्षक भिंतीचा



काही भाग पाडण्यास सुरुवात केली. ही कारवाई सुरू होताच मंदिरातील महिला साध्वींनी त्याला आक्षेप घेतला. कोणतीही पूर्वसूचना किंवा पाडकामाची नोटीस न देता ही कारवाई करण्यात येत असल्याचा आरोप त्यांनी केला. तसेच संबंधित जागेची कागदपत्रे उपलब्ध असून, महापालिकेची कारवाई बेकायदेशीर असल्याचे सांगत त्यांनी काम थांबविण्याची मागणी केली.

दरम्यान, महापालिका अधिकाऱ्यांनी संबंधित जागेचे मालकी हक्क व जागेच्या वापरासंदर्भातील कागदपत्रे सादर करण्यास सांगितले. महापालिकेच्या वतीने सदर जागेवर अतिक्रमण असल्याचे सांगण्यात येत असल्याने दोन्ही बाजूंमध्ये वाद अधिकच वाढला. यानंतर ध्यान मंदिराच्या वतीने पोलिसांना बोलाविण्यात आले. मंदिर प्रशासनाने संबंधित जागेची कागदपत्रे पोलिसांसमोर सादर केली. पोलिसांच्या हस्तक्षेपानंतर पाडकामाची कारवाई थांबविण्यात आली.या घटनेनंतर पोलिसांनी महापालिकेचे अधिकारी आणि ध्यान मंदिरातील प्रमुख साध्वी यांना तोफखाना पोलीस ठाण्यात नेऊन दोन्ही बाजूंचे म्हणणे जाणून घेतले. यावेळी साध्वींच्या वतीने लेखी तक्रार दाखल करण्यात आली. मंदिरातील महिला साध्वी, विद्यार्थी आणि सेवाधारकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. संबंधित जागेवर ताबा मिळविण्यासाठी काही व्यक्ती कोणत्याही थराला जाऊ शकतात, अशी भीती व्यक्त करून ध्यान मंदिराला पोलीस संरक्षण देण्याची मागणी करण्यात आली आहे.प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय ही जागतिक स्तरावर कार्यरत असलेली महिलांद्वारे संचालित आध्यात्मिक संस्था आहे. राजयोग, ध्यानधारणा, आत्मजागृती आणि मानवी मूल्यांचा प्रसार करण्याचे कार्य या संस्थेच्या माध्यमातून केले जाते. जगभरातील १४७ हून अधिक देशांमध्ये संस्थेचे कार्य विस्तारले असून, आठ हजारांहून अधिक शाखांच्या माध्यमातून आध्यात्मिक उपक्रम राबविले जातात.

अहिल्यानगरमधील या संस्थेचे केंद्र सन १९८९ पासून महावीरनगर, सावेडी येथे कार्यरत आहे.

अन्न व औषध प्रशासनाच्या कारवाईविरोधात औषध विक्रेते आक्रमक

राज्यव्यापी आंदोलनाचा इशारा!

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

अहिल्यानगर– अन्न व औषध प्रशासनाकडून राज्यातील औषध विक्रेत्यांविरुद्ध किरकोळ स्वरूपाच्या त्रुटी आणि छोट्या चुकांवरही कठोर कारवाई केली जात असल्याचा आरोप करत औषध विक्रेत्यांनी आता आक्रमक भूमिका घेतली आहे. प्रशासनाच्या या कथित अन्यायकारक आणि जाचक कारवाईविरोधात राज्यातील औषध विक्रेत्यांची संघटना आंदोलनाच्या तयारीत असून, अहिल्यानगर जिल्हा केमिस्ट असोसिएशननेही या आंदोलनाला पाठिंबा देत आंदोलनात्मक भूमिका घेण्याचा निर्धार व्यक्त केला आहे.



औषध विक्रेत्यांविरुद्ध अन्न व औषध प्रशासनाकडून करण्यात येणाऱ्या कारवाईविरोधात दाद मागण्यासाठी यापूर्वी ९० दिवसांचा कालावधी उपलब्ध होता. मात्र, हा कालावधी शून्य दिवसांवर आणण्यात आल्याने औषध विक्रेत्यांना अपील करण्याची संधीच नाकारली जात असल्याची संघटनेची तक्रार आहे. यामुळे नैसर्गिक न्यायाच्या तत्त्वालाच हरताळ फासला जात असून, औषध विक्रेत्यांना आपली बाजू मांडण्याची पुरेशी संधी मिळत नसल्याचा आरोप करण्यात आला आहे.विशेष म्हणजे, किरकोळ स्वरूपाच्या त्रुटींसाठी औषध विक्रेत्यांवर कठोर कारवाई केली जात असताना, त्यापेक्षाही गंभीर स्वरूपाचे नियमभंग करणारे काही डॉक्टर तसेच ऑनलाइन औषध विक्रेत्यांकडे प्रशासनाकडून अपेक्षित गांभीर्याने लक्ष दिले जात नसल्याचा सवाल संघटनेने उपस्थित केला आहे. कारवाई करताना सर्वांसाठी समान निकष असावेत, तसेच औषध विक्रेत्यांनाही आपली बाजू मांडण्याची आणि न्याय मिळविण्याची संधी मिळावी, अशी मागणी संघटनेने केली आहे.या संदर्भात राज्य संघटनेच्या वतीने शासनाकडे वेळोवेळी पत्रव्यवहार करून अन्यायकारक कारवायांबाबत लक्ष वेधण्यात आले आहे.

परीकथांच्या जादुई विश्वापासून माणुसकीच्या मूल्यांपर्यंत; पोदार स्कूलचे स्नेहसंमेलन उत्साहात

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

अहिल्यानगर– पोदार इंटरनॅशनल स्कूल, अहिल्यानगरचे दहावे वार्षिक स्नेहसंमेलन सावेडी येथील मौली सभागृहात उत्साहात पार पडले. दोन दिवस चाललेल्या या सांस्कृतिक सोहळ्यात विद्यार्थ्यांनी नृत्य, नाटिका, संगीत आणि अभिनयातून कलागुणांचे दर्शन घडविले. प्राथमिक विभागासाठी 'फेअरी टेल्स व्हेअर स्टोरीज डान्स, ड्रीम्स फ्लाय अँड मॅजिक कम्स अलाइव्ह', तर माध्यमिक विभागासाठी 'बीइंग ह्युमन बी द रिझन फॉर समवन टू बिलीव्ह इन गुडनेस' या संकल्पना मांडण्यात आल्या होत्या.

इयत्ता पहिली ते चौथीच्या विद्यार्थ्यांचा कार्यक्रम झाला. यावेळी सहाय्यक कामगार आयुक्त रेवनाथ विसले आणि जिल्हा परिषदेचे प्राथमिक शिक्षणाधिकारी भास्कर पाटील प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. तसेच पोदार मांजरीच्या प्राचार्या मीनल वैद्य, पुनावालाच्या रिंकू अग्रवाल, खोपोलीच्या वैशाली रणसुभे आणि वाकडचे अग्रेल कारव्हॅलो उपस्थित होते. विद्यार्थ्यांनी सिंड्रेला, स्नो व्हाइट, अलादीन आणि जंगल बुक या परीकथांवर आधारित नृत्य व नाटिका सादर करून रंगमंचावर जादुई विश्व साकारले.

इयत्ता पाचवी ते दहावीच्या विद्यार्थ्यांचा कार्यक्रम झाला. यावेळी लष्करी वाहनांच्या गुणवत्ताहमीचे पर्यवेक्षण करणारे ब्रिगेडियर राजीव चावला व सौ. प्रियंका चावला तसेच शिक्षणाधिकारी संध्या गायकवाड प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. यासह पोदार रोहकलचे विशाल जाधव, दौंडच्या स्वाती कणसे, पुणे हबचे जनरल मॅनेजर मनोज काळे, वाघोलीचे मनीष शर्मा, हडपसरचे ए. के. सिंह, तळेगावचे सुधांशू नायक, उंड्रीचे संजीव भारद्वाज, नाशिकचे डॉ. मनोहर महाजन, चाळीसगावचे अजय घोरपडे, शिरूरचे नीरज राय, इगतपुरीचे संदेश खताळ आणि रयत इंग्लिश मीडियम स्कूल, साताऱ्याचे मॅनेजर महेंद्र काटकर उपस्थित होते.



कार्यक्रमांची सुरुवात दीपप्रज्वलन व स्वागतगीताने झाली. माध्यमिक विभागातील विद्यार्थ्यांनी माणुसकी, प्रेम, दया, सहानुभूती, समानता, परोपकार आणि सामाजिक बांधिलकी या मूल्यांवर आधारित सादरीकरण केले. गरजूंना मदत करणे, दुसऱ्याच्या दुःखात सहभागी होणे आणि छोट्या कृतीतून इतरांच्या जीवनात आनंद निर्माण करणे, असे संदेश प्रभावीपणे मांडले.

प्राचार्य मंगेश जगताप यांनी मार्गदर्शन करताना परीकथांमधून विद्यार्थ्यांमध्ये कल्पनाशक्ती, धैर्य, मैत्री आणि प्रामाणिकपणा यांसारखी मूल्ये रुजतात, असे सांगितले. शिक्षणाचा उद्देश केवळ शैक्षणिक यश नसून संवेदनशील व जबाबदार नागरिक घडविणे हा आहे. 'चांगुलपणावर विश्वास ठेवण्याचे कारण कोणासाठी तरी बना' हा संदेश विद्यार्थ्यांनी दैनंदिन जीवनात आचरणात आणावा, असे आवाहन त्यांनी केले.

प्रमुख पाहुणे रेवनाथ विसले यांनी सांस्कृतिक उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास, कल्पनाशक्ती आणि संघभावना विकसित होत असल्याचे सांगून सादरीकरणाचे कौतुक केले. ब्रिगेडियर राजीव चावला यांनी आधुनिक तंत्रज्ञानाच्या युगात मानवी मूल्ये जपण्याचे महत्त्व अधोरेखित केले. विद्यार्थ्यांनी आपल्या ज्ञानाचा उपयोग समाजकल्याणासाठी करावा, असा संदेश त्यांनी दिला.

२८ नोव्हेंबरपासून राज्यस्तरीय खो-खो अजिंक्यपद स्पर्धेचा थरार

पुरुष व महिला गटांत राज्यातील ४८ संघांचा सहभाग; सुमारे साडेसातशे खेळाडूंची उपस्थिती । न्यू आर्ट्स महाविद्यालयाच्या मैदानावर माजी आमदार स्व. अरुणकाका जगताप क्रीडानगरीचे आमदार संग्राम जगताप यांच्या हस्ते भूमिपूजन



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

अहिल्यानगर– महाराष्ट्र राज्य खो-खो संघटनेच्या मान्यतेने आणि अहमदनगर जिल्हा खो-खो असोसिएशनच्या मार्गदर्शनाखाली एकलव्य क्रीडा मंडळ, निर्मलनगर यांच्या वतीने ६२ वी पुरुष व महिला राज्य अजिंक्यपद व निवड चाचणी खो-खो स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. दि. २८ नोव्हेंबर ते १ डिसेंबर २०२६ या कालावधीत न्यू आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स महाविद्यालयाच्या मैदानावर ही स्पर्धा रंगणार आहे. या स्पर्धेसाठी उभारण्यात येणाऱ्या माजी आमदार स्वर्गीय अरुणकाका जगताप क्रीडानगरी मैदानाचे भूमिपूजन आमदार संग्राम जगताप यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे शहर जिल्हाध्यक्ष संपत बारस्कर, नगरसेवक निखिल वारे, निर्मलचंद्र थोरात, प्राध्यापक सुनील जाधव, ज्ञानेश्वर काळे, प्राचार्य बाळासाहेब सागडे, नगरसेवक महेश लोंढे, अभिजित बोरुडे, सुधाकर सुंबे, बाळासाहेब पवार यांच्यासह खेळाडू मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी आमदार संग्राम जगताप म्हणाले की, नगर जिल्हा हा क्रीडाप्रेमी जिल्हा असून, विविध क्रीडा प्रकारांतून चांगले खेळाडू घडत आहेत. या खेळाडूंचा आदर्श इतरांनीही घ्यावा, यासाठी राज्य व राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धांचे आयोजन होणे गरजेचे आहे. स्पर्धांच्या माध्यमातून खेळाडू खऱ्या अर्थाने घडत असतात. मैदानावर खेळण्यासाठी येणाऱ्या खेळाडूंमध्ये ऊर्जा आणि प्रेरणा निर्माण होते. त्यातून खेळाविषयी आवड निर्माण होऊन नव्या खेळाडूंना प्रोत्साहन मिळते.

खो-खो हा पारंपरिक मैदानी खेळ असून, राज्यस्तरीय स्पर्धेच्या निमित्ताने अहिल्यानगर जिल्ह्यातील खेळाडूंना राज्यभरातील उत्कृष्ट खेळाडूंचा खेळ पाहण्याची संधी मिळणार आहे. त्यामुळे जिल्ह्यातील क्रीडाप्रेमींनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून या स्पर्धेचा आनंद घ्यावा, असे आवाहन आमदार जगताप यांनी केले.

यावेळी निर्मलचंद्र थोरात म्हणाले की, सुमारे ४० वर्षांनंतर पुन्हा एकदा अहिल्यानगर शहरात या राज्यस्तरीय स्पर्धेचे आयोजन होत आहे. या स्पर्धेत राज्यातील पुरुषांचे २४ आणि महिलांचे २४ असे एकूण ४८ संघ सहभागी होणार आहेत. सुमारे ७५० खेळाडूंसह प्रशिक्षक, संघ व्यवस्थापक, पंच, तांत्रिक समितीचे सदस्य आणि महाराष्ट्र खो-खो संघटनेचे पदाधिकारी उपस्थित राहणार आहेत. त्यामुळे शहरात खो-खो खेळाचा मोठा क्रीडामहोत्सव अनुभवायला मिळणार असल्याचे त्यांनी सांगितले.

नगरसेवक निखिल वारे म्हणाले की, न्यू आर्ट्स महाविद्यालयाच्या मैदानावरील खो-खो स्पर्धेच्या मैदानाला माजी आमदार स्वर्गीय अरुणकाका जगताप क्रीडानगरी असे नाव देण्यात आले आहे. या ठिकाणी चार स्वतंत्र मैदाने तयार करण्यात येणार असून, दिवसा तसेच रात्री विद्युत रोषणाईमध्ये सामने खेळविण्यात येतील. प्रेक्षकांसाठी तीन ते चार हजार आसनक्षमतेची गॅलरी उभारण्यात येणार आहे.स्पर्धेतील सामन्यांचे आकाशवाणी, यूट्यूब, फेसबुक, इन्स्टाग्राम तसेच अन्य सोशल मीडिया माध्यमांद्वारे थेट प्रक्षेपण करण्यात येणार आहे. त्यामुळे प्रत्यक्ष मैदानावर उपस्थित राहू न शकणाऱ्या क्रीडाप्रेमींनाही सामन्यांचा आनंद घेता येणार आहे, असे त्यांनी सांगितले.यावेळी न्यू आर्ट्स महाविद्यालयाचे प्राचार्य बाळासाहेब सागडे यांनी राज्यस्तरीय खो-खो स्पर्धेस शुभेच्छा दिल्या. भूमिपूजन कार्यक्रमाला क्रीडा क्षेत्रातील मान्यवर, पदाधिकारी आणि खेळाडू मोठ्या संख्येने उपस्थित होते.

ग्रामीण बालप्रतिभेचा आकाशवाणीवरून जागर; डोंगरगणच्या विद्यार्थ्यांची 'स्वप्नांना बळ देऊया'

उद्या शनिवारी, २१ नोव्हेंबर रोजी सकाळी ८.४० वाजता आकाशवाणी अहिल्यानगरच्या 'लोकजागर' कार्यक्रमातून होणार प्रसारण

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

अहिल्यानगर– जागतिक बालदिनाचे औचित्य साधून जिल्हा परिषद प्राथमिक शाळा डोंगरगण (ता. व जि. अहिल्यानगर) येथील विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या 'स्वप्नांना बळ देऊया...!' या अभिनव श्रुतनाटिकेचे ध्वनिमुद्रण आकाशवाणी अहिल्यानगर केंद्रावर नुकतेच उत्साहपूर्ण वातावरणात पार पडले. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या कलागुणांना, कल्पकतेला आणि अभिव्यक्तीला आकाशवाणीसारख्या प्रतिष्ठित माध्यमातून व्यासपीठ मिळणार असून, ही श्रुतनाटिका शुक्रवार, दि. २० नोव्हेंबर २०२६ रोजी सकाळी ८.४० वाजता आकाशवाणी अहिल्यानगर केंद्राच्या 'लोकजागर' या कार्यक्रमातून प्रसारित होणार आहे.



यंदाच्या जागतिक बालदिनाची अर्थात 'माझा दिवस, माझे हक्क, माझे भविष्य' ही संकल्पना केंद्रस्थानी ठेवून या श्रुतनाटिकेची निर्मिती करण्यात आली आहे. बालकांचे हक्क, त्यांचे भावविश्व, स्वप्ने, आकांक्षा, शिक्षणातील समान संधी आणि सुरक्षित बालपण या महत्त्वपूर्ण विषयांना कवितांच्या, गीतांच्या आणि प्रभावी निवेदनाच्या माध्यमातून स्पर्श करण्यात आला आहे. प्रत्येक बालकाला स्वतःची स्वप्ने पाहण्याचा, ती व्यक्त करण्याचा आणि ती प्रत्यक्षात साकार करण्यासाठी समान संधी मिळण्याचा अधिकार आहे, हा या संपूर्ण सादरीकरणाचा मूलभूत विचार आहे.

'स्वप्नांना बळ देऊया...!' ही केवळ मनोरंजन करणारी श्रुतनाटिका नसून बालकांच्या हक्कांविषयी समाजात जाणीव निर्माण करणारा एक संवेदनशील आणि विचारप्रवर्तक उपक्रम आहे. शिक्षणाचा अधिकार, समानतेचा अधिकार, सुरक्षिततेचा अधिकार, बालपण जगण्याचा अधिकार आणि स्वतःचे विचार व्यक्त करण्याचे स्वातंत्र्य या विषयांची प्रभावी मांडणी यातून करण्यात आली आहे.

श्रुतनाटिकेची सुरुवात बालपणाचे महत्त्व अधोरेखित करणाऱ्या विचारांनी होते. त्यानंतर बालकांच्या हक्कांचा प्रवास, भारतीय संविधानाने दिलेली समानतेची मूल्ये, शिक्षणाचे महत्त्व, संघर्षातून यशाकडे वाटचाल, देशाभिमान, निसर्गसंवर्धन, इतिहासातील शौर्यगाथा आणि भारतीय संस्कृतीतील सण-उत्सव अशा विविध विषयांची सुरेख गुंफण करण्यात आली आहे.

विशेष म्हणजे, विद्यार्थ्यांनी विविध विषयांवरील कविता, गीतांचे सादरीकरण आणि ऐतिहासिक व्यक्तिरेखेच्या माध्यमातून आपली अभिव्यक्ती साकारली आहे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्वराज्य स्थापनेत महत्त्वपूर्ण योगदान देणारे वीर सरदार मुरारबाजी देशपांडे यांच्या शौर्याची आठवण करून देणारे एकपात्री स्वगतही या श्रुतनाटिकेचे विशेष आकर्षण ठरणार आहे. इतिहासातील प्रेरणादायी प्रसंगातून धैर्य, निष्ठा, स्वाभिमान आणि राष्ट्रप्रेमाची मूल्ये विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.

या श्रुतनाटिकेचा समारोप अत्यंत भावस्पर्शी आणि आशयपूर्ण संदेशाने होतो. 'मुलांना पंख देऊया, पण त्यांच्यासाठी आकाशही खुले ठेवूया' या विचारातून मुलांच्या स्वप्नांना प्रोत्साहन देण्याबरोबरच त्यांना योग्य संधी, स्वातंत्र्य आणि पोषक वातावरण उपलब्ध करून देण्याची जबाबदारी समाजाची असल्याचे अधोरेखित करण्यात आले आहे. कोणतेही मूल शिक्षणापासून वंचित राहणार नाही, प्रत्येक मुलाला गुणवत्तापूर्ण शिक्षणाची संधी मिळेल आणि प्रत्येक बालकाचे भविष्य सुरक्षित व उज्ज्वल असेल, असा संकल्प या सादरीकरणातून व्यक्त करण्यात आला आहे.

शहरी आणि ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना समान संधी मिळाल्यास त्यांच्यातील कलागुण, सर्जनशीलता आणि आत्मविश्वास निश्चितच फुलू शकतो, याचे प्रत्यंतर या उपक्रमातून येत आहे. जिल्हा परिषद शाळेतील इयत्ता पहिली ते चौथीच्या विद्यार्थ्यांनी आपल्या आवाजातून, उच्चारांतून, सादरीकरणातून आणि विषयाच्या समजुतीतून ही श्रुतनाटिका साकारली आहे. रेडिओसारख्या ध्वनीमाध्यमासाठी आवश्यक असणारे स्पष्ट उच्चार, आवाजातील चढ-उतार, भावपूर्ण वाचन, शब्दफेक आणि श्रवणीयता या बाबींचा विचार करून विद्यार्थ्यांनी सादरीकरण केले.

आजच्या डिजिटल युगात दृकश्राव्य माध्यमांचा प्रभाव वाढत असताना रेडिओसारख्या पारंपरिक आणि विश्वासार्ह माध्यमातून विद्यार्थ्यांना आपले विचार मांडण्याची संधी मिळणे ही त्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासाच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण बाब आहे. या अनुभवातून विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढण्यासोबतच भाषा कौशल्य, वाचन, श्रवण, स्मरणशक्ती, सर्जनशीलता आणि सांघिक कार्याची जाणीव विकसित होण्यास मदत होत आहे.

आकाशवाणी अहिल्यानगरचे कार्यक्रम अधिकारी सुदाम बटुळे यांनी या कार्यक्रमाच्या सादरीकरणासाठी मार्गदर्शन केले. शाळेचे मुख्याध्यापक तथा राष्ट्रपती पुरस्कारप्राप्त शिक्षक नारायण मंगलारम आणि उपक्रमशील शिक्षक ज्ञानेश्वर चेडे यांनी श्रुतनाटिकेचे संकल्पनात्मक नियोजन, लेखन, विद्यार्थ्यांची तयारी आणि सूत्रसंचालनाची जबाबदारी सांभाळली.

विद्यार्थ्यांच्या वयोगटाला अनुरूप भाषा, विविध विषयांची आशयपूर्ण निवड, कवितांची आणि गीतांची सांगड, ऐतिहासिक प्रसंगांची मांडणी तसेच बालहक्कांचा संदेश या सर्व बाबींचा समन्वय साधत या श्रुतनाटिकेची निर्मिती करण्यात आली. पाठ्यपुस्तकातील शिक्षणाला प्रत्यक्ष अनुभवांची जोड देत विद्यार्थ्यांना स्वतःच्या अभिव्यक्तीसाठी संधी उपलब्ध करून देणे, या शैक्षणिक दृष्टिकोनातून हा उपक्रम राबविण्यात आला.

या श्रुतनाटिकेत प्रिया कदम, आरोही मते, कावेरी पटारे, शंभू चांदणे, रुचिता कदम, कृत्तिका पटारे, आकांक्षा निकम, सम्राट चांदणे, प्रिया गोलवड, श्रवणी चांदणे, अक्षरा चांदणे, आकांक्षा चांदणे, आरोही चांदणे, स्वामी कदम आणि श्रीनाथ हिलगुडे या विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला आहे.जिल्हा परिषद प्राथमिक शाळा डोंगरगण येथे विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी विविध शैक्षणिक, सांस्कृतिक, साहित्यिक आणि नाविन्यपूर्ण उपक्रम सातत्याने राबविले जातात.

देव दिवाळीनिमित्त मंगळवार २४ रोजी नवीपेठ येथील श्रीराम मंदिरात आकर्षक विद्युत रोषणाई

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

अहिल्यानगर– अहिल्यानगर येथील श्रीराम मंदिरात देव दिवाळीनिमित्त मंगळवार दि २४ नोव्हेंबर २०२६ रोजी आकर्षक विद्युत रोषणाई व दिपोत्सव करण्यात येणार असून या देव दिवाळीनिमित्त हजारो दीप प्रज्वलित करण्यात येणार असल्याची माहिती श्रीराम भक्त हनुमान सत्संग मंडळ ट्रस्टच्यावतीने सांगण्यात आले. तसेच ता १६ नोव्हे रोजी श्रीराम मंदिरात अन्नकूट (छप्पनभोग) व भजन संध्या मंदिरात सर्व भक्तां समवेत मोठ्या थाटामाटात साजरा करण्यात आला व २००० . भाविक भक्तांनी महाप्रसादाचा लाभ घेतला अशी माहिती ट्रस्ट चे अध्यक्ष प्रितम मुथ्था यांच्या वतीने देण्यांत आली



नवी पेठ येथील श्रीराम मंदिरात श्रीराम भक्त हनुमान सत्संग मंडळ ट्रस्टच्या वतीने वर्षभरात विविध कार्यक्रम साजरे करण्यात येतात तसेच दर शनिवारी भक्तिभावाने रात्री ८ वाजता हनुमान चालीसा पठण व भजन संध्या व महाप्रसाद आयोजन करण्यात येते गेल्या १८वर्षापासून अविरतपणे ट्रस्टच्या माध्यमातून अनेक धार्मिक उत्सव या मंदिरामध्ये साजरा होत आहेत.

देव दिवाळीनिमित्त अयोध्या च्या धर्तीवर श्रीराम भक्त हनुमान सत्संग मंडळ ट्रस्ट च्या वतीने श्रीराम मंदिरास आकर्षक अशी विद्युत रोषणाई व फुलांची सजावट करण्यात आली तसेच मंगळवार २४ रोजी हजारो दिव्यांनी दीप प्रज्वलित करून आकर्षक दिपोत्सव सजावट करण्यात येणार आहे तरी या उत्सवात नगर शहरातील भावीक भक्तांनी दर्शनासाठी उपस्थित राहावे असे श्रीराम भक्त हनुमान सत्संग मंडळ ट्रस्ट चे उपाध्यक्ष निखिल शेटिया नी सर्व अहिल्या नगर वासियांनी सहभागी व्हावे अशी आवाहन करण्यात आले आहे.

नागरिकांच्या सहयोगातून रस्त्यालगत जल पुर्नभरण...

आयुक्त डांगे यांच्याकडून विशेष कौतुक



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

अहिल्यानगर– येथील हरियाली संस्थेच्या माध्यमातून महावीर गल्ली धरती चौक परिसरातील रहिवासी नागरिकांच्या सहभागातून दुष्काळी परिस्थितीत पाणीटंचाईवर मात करण्यासाठी भूगर्भातील पाण्याची पातळी वाढवण्याकरता जल पुनर्भरण तंत्र वापरून हा प्रकल्प महावीर गल्ली या ठिकाणी करण्यात आला. महापालिका आयुक्त श्री यशवंत डांगे यांनी भेट देऊन प्रकल्पाची पाहणी करून कौतुक केले. तसेच नागरिकांनी अशा प्रकारचे प्रकल्प आपल्या घरासमोर केल्यास पाणी टंचाईवर मात करणे सहज शक्य होईल असी अपेक्षा व्यक्त केली.

अहिल्यानगर येथील महावीर गल्ली धरती चौक परिसरात सिमेंट रस्त्याचे काम करण्यापूर्वी परिसरातील रहिवाशी महानगर पालिका वृक्ष प्राधिकरण सदस्य तुलसीराम पालीवाल यांच्या स्व खर्चा तून हा प्रकल्प राबविण्यात आला असून एक फूट रुंदीचे मुरूमा पर्यंत पाच फुट खोलीचे चार खड्डे घेऊन त्यामध्ये छिद्र असलेले सहा इंच रुंद बाय पाच फुट उंचीचे पीव्हीसी पाईप सोडुन खड्ड्यामध्ये पाईपच्या बाहेरील बाजूने जाड खडी,कोळसा व वरील बाजूस जाळी टाकून त्या वर कच टाकून खड्डे बुजवण्यात आले. पावसाचे वाहून जाणारे पाणी या कच आणि खडी मधून झिरपून पाईपच्या छिद्रातुन चार खड्ड्या मधे सरासरी ४५० ते ५०० लिटर स्वच्छ पाणी जमा होईल आणि ते पाणी पुढील काही तासा मधे जमिनीत मुरेल प्रत्येक पावसाच्या वेळी वारंवार ही प्रक्रिया होत राहील त्या मुळे भूगर्भातील खालवलेली पाण्याची पातळी वाढण्यास निश्चित मदत होईल. आणि बोअरवेल मधील पाण्याचे क्षार कमी होऊन त्या पाण्याची गुणवत्ता सुधारण्यास मदत होईल त्याचा फायदा परिसरातील नागरिकांच्या बोरवेलला दुष्काळी परिस्थितीतही पाणी उपलब्ध होण्यास मदत होईल. तसेच आता शहरात सिमेंट काँक्रीटचे रस्ते होत असल्याने पावसाचे पाणी जमिनीत मुरण्यास वाव कमी आहे म्हणून अशा प्रकारचे शोष खड्डे रस्त्यांच्या बाजूस जागोजागी घेऊन पावसाचे पाणी जमिनीत जिरवणे आवश्यक आहे . असे आयुक्त यशवंत डांगे म्हणाले.

हा प्रकल्प निर्माण करण्यासाठी तुलसीराम पालीवाल, हरियालीचे अध्यक्ष सुरेश खामकर, असलम शेख, रफिक भाई आदींनी परिश्रम घेतले. यावेळी संभाजी कदम, अमोल निस्ताने, सोमेश पालीवाल, जालिंदर बोरुडे आदींसह परिसरातील नागरिकांनी प्रकल्पस्थळी येऊन प्रत्यक्ष पाहणी करून प्रकल्पाची माहिती जाणून घेतली.

विकासकामांच्या माध्यमातून मूलभूत सुविधा देण्यासाठी कटिबद्ध - आ. काशिनाथ दाते

रांजणगाव मशिद ते वाळवणे रस्ता कामांचे भूमिपूजन संपन्न

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

अहिल्यानगर– पारनेर-नगर विधानसभा मतदारसंघाचे आमदार काशिनाथ दाते सर यांच्या विशेष प्रयत्नांतून रांजणगाव मशिद ते वाळवणे रस्त्याच्या सुधारणेसह विविध विकासकामांचा भूमिपूजन समारंभ पिंपरी गवळी येथे आमदार काशिनाथ दाते सर यांच्या शुभहस्ते संपन्न झाला. रांजणगाव मशिद ते वाळवणे या रस्त्याच्या सुधारणेसाठी ३ कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला असून, या कामामुळे परिसरातील नागरिकांच्या दळणवळणाचा प्रश्न सुटण्यास मदत होणार आहे.

यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष वसंतराव चेडे, भाजपचे मंडलाध्यक्ष राहुल पाटील शिंदे, भाजपच्या जिल्हा उपाध्यक्ष अश्विनीताई थोरात, राष्ट्रवादी काँग्रेसच्या महिला तालुकाप्रमुख सुषमा रावडे, रामचंद्र मांडगे, आनंदराव रणसिंग, पंडित थोरात, किसनराव मांडगे, संपतराव मांडगे, सुनील थोरात, सागर मैड, दत्तानाना पवार, बाळासाहेब बारवकर, मीना येणारे, बंटी साबळे, महेश देशमुख, उत्तमराव पठारे, अनिल दिवटे, मनोज मुंगसे, काका देशमुख, लहू भालेकर, शेखर साबळे आदी मान्यवरांसह स्थानिक नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी बोलताना आ. दाते सर म्हणाले ग्रामीण भागाचा सर्वांगीण विकास साधायचा असेल तर रस्ते, पाणी, वीज आणि इतर मूलभूत सुविधांना प्राधान्य देणे



आवश्यक आहे. चांगले रस्ते हे केवळ दळणवळणाचे साधन नसून गावाच्या आर्थिक, सामाजिक आणि शैक्षणिक प्रगतीचा महत्त्वाचा आधार आहेत. त्यामुळे मतदारसंघातील प्रत्येक गावाच्या गरजा समजून घेऊन आवश्यक विकासकामांसाठी शासनदरबारी सातत्याने पाठपुरावा करण्याची आपली भूमिका आहे.

विकासकामे मंजूर करून आणणे ही जबाबदारी जितकी महत्त्वाची आहे, तितकीच ती कामे दर्जेदार आणि नियोजित वेळेत पूर्ण होणेही आवश्यक आहे. सार्वजनिक निधीतून होणाऱ्या प्रत्येक कामाचा लाभ सर्वसामान्य नागरिकांना मिळाला पाहिजे. त्यामुळे संबंधित कामांच्या गुणवत्तेकडे स्थानिक नागरिकांनीही लक्ष द्यावे आणि विकासकामे पूर्णत्वास नेण्यासाठी सहकार्य करावे, असे आवाहन त्यांनी केले.

पारनेरनगर विधानसभा मतदारसंघातील गावागावांत विकासाची गंगा पोहोचविण्यासाठी आपण सातत्याने प्रयत्नशील असून, राजकीय विचारधारा वेगवेगळ्या असल्या तरी विकासाच्या बाबतीत सर्वांनी एकत्र येणे महत्त्वाचे आहे. जनतेने दाखविलेला विश्वास सार्थ ठरविण्यासाठी पदाचा उपयोग सर्वसामान्यांचे प्रश्न सोडविण्यासाठी आणि मतदारसंघातील जनतेच्या विकासासाठीच झाला पाहिजे ही आपली भूमिका आहे.

रस्त्याच्या सुधारणेसाठी निधी उपलब्ध करून दिल्याबद्दल स्थानिक नागरिकांनी समाधान व्यक्त केले. या विकासकामामुळे परिसरातील गावांना दळणवळणाच्या दृष्टीने मोठा फायदा होणार असून, परिसराच्या विकासाला नवी गती मिळण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे. गावांचा विकास हाच मतदारसंघाच्या प्रगतीचा पाया असून, जनतेच्या अपेक्षा पूर्ण करण्यासाठी विकासकामांचा हा प्रवास अविरत सुरू राहील, असा विश्वास या भूमिपूजन सोहळ्याच्या निमित्ताने आमदार काशिनाथ दाते सर यांनी व्यक्त केला.

रांजणगाव मशीद ते वाळवणे रस्त्याच्या सुधारणेसाठी आमदार काशिनाथ दाते सरांनी केलेल्या प्रयत्नांमुळे तब्बल ३ कोटी रुपयांचा निधी उपलब्ध झाला, ही आमच्या परिसरासाठी अत्यंत आनंदाची आणि अभिमानाची बाब आहे. अनेक वर्षांपासून अपेक्षित असलेल्या या रस्त्याच्या कामामुळे नागरिकांचा प्रवास सुखकर होणार असून दळणवळणाला मोठी चालना मिळणार आहे. आमदार दाते सरांनी आपल्या कार्यकाळात विकासकामांना दिलेले प्राधान्य निश्चितच कौतुकास्पद आहे. त्यांच्या माध्यमातून परिसरातील इतरही प्रलंबित प्रश्न मार्गी लागतील, असा आम्हाला विश्वास आहे. या विकासकामाबद्दल समस्त ग्रामस्थांच्या वतीने आमदार दाते सरांचे मनःपूर्वक आभार व्यक्त करतो.

– राहुल पाटील शिंदे
(मंडलाध्यक्ष, पारनेर भाजपा)

(पान १ वरून)

दुष्काळी मदतीची मर्यादा दोन हेक्टर वरून तीन हेक्टर करा

खरीप हंगाम वाया गेल्यानंतर रब्बी हंगामाचीही आशा मावळल्याने शेतकऱ्यांसमोर कुटुंबाचा उदरनिर्वाह, कर्जाची परतफेड आणि शेतीचा पुढील खर्च यांचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे.

या पार्श्वभूमीवर महायुती सरकारने शेतकऱ्यांना दिल्या जाणाऱ्या दुष्काळी अनुदानाची मर्यादा दोनऐवजी तीन हेक्टर करावी. यासाठी नेवासा विधानसभा मतदारसंघाचे आमदार विठ्ठलराव लंघे यांनी पुढाकार घेऊन शासनदरबारी शेतकऱ्यांची बाजू ठामपणे मांडावी, अशी विनंती करण्यात आली आहे. आमदार लंघे हे स्वतः शेतकरी कुटुंबातील असल्याने त्यांना शेतकऱ्यांच्या अडचणींची जाणीव आहे. त्यामुळे त्यांनी या मागणीसाठी शासनाकडे प्रभावी पाठपुरावा करून संकटग्रस्त शेतकऱ्यांना दिलासा मिळवून द्यावा, असे आवाहन शिवराज कापरे यांनी केले आहे.

एसटी बसथांब्यांसाठी १ कोटी २० लाखांचा निधी मंजूर

जनतेच्या समस्या ऐकणे नव्हे, तर त्या समस्या सोडविण्यासाठी शासनदरबारी प्रभावीपणे आवाज उठवून प्रत्यक्ष निर्णयापर्यंत पोहोचणे होय. सहा बसथांब्यांसाठी निधी मंजूर केल्याबद्दल परिवहन मंत्री ना. प्रताप सरनाईक यांचे खुप खुप धन्यवाद